www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ६३ मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा-सुविधा तयार करा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास सादरीकरण बैठक

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** राज्यातील ज्योतिर्लिंगाना वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक भेट देतात हे लक्षात घेऊन श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरातील कामे गतीने करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थान येथे पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास सादरीकरणाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला मुख्य सचिव राजेश कुमार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग व्ही.राधा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांच्या संख्येच्या व भविष्यातील संख्येनुसार दर्शन रांगांचे नियोजन करावे, यात्रा, उत्सव कालावधी हे लक्षात घेऊन मंदिर परिसरात प्रतीक्षा कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, निवासाची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, परिसर साफसफाई करणे, माहिती फलक,

पर्यटक स्वागत कक्ष, पार्किंग व्यवस्थापन, आपत्कालीन यंत्रणा, तिकीट कक्ष, आरोग्य सुविधा, उपहारगृह यासह पर्यटन वाढीला चालना देणारे उपक्रम या भागात प्रामुख्याने राबवा. स्थानिक नागरिक व प्रशासनाला विचारात घेऊन येथील कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था काटेकोर असावी यासाठी खबरदारी घेण्यात यावी. अत्याधुनिक यंत्रणा तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने एकात्मिक सुरक्षा प्रणाली विकसित करा. जेणेकरून तात्काळ आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत मिळेल. मंदिर व्यवस्थापनासाठी काटेकोर नियम असणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धन व रोजगार निर्मितीसाठी पर्यटन विभागाचेही येथील प्रस्तावित कामे गतीने करावीत. आज सादर झालेल्या आराखड्यांना उच्चस्तरीय समितीच्या मंजूरीनंतर निधी मिळेल. पुरातत्व विभागाकडून घेण्यात येणाऱ्या मंजुरीसाठी केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबत एक स्वतंत्र बैठक आयोजित करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.राज्यातील ज्योतिर्लिंगाच्या विकास आराखड्याची प्रभावी व तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त असलेले अधिकारी यांनी यावेळी विकास आराखड्यांचे सादरीकरण केले. पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा व श्री क्षेत्र भीमाशकर विकास आराखडा कुंभमेळा 2027 चे सादरीकरण सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथचे सादरीकरण वित्त विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा सादरीकरण अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी यांनी केले.

या बैठकीला नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के. एच. गोविंदराज, विधि व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, वित्त विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, पर्यटन विभागाचे सचिव संजय खंदारे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे सचिव अण्णासाहेब धुळाज नाशिक – त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंग दृरदृश्यप्रणालीद्वारे नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकात पुलकंडवार, छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर इतर विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# लाल किल्ला मेट्रो स्टेशन स्फोटानंतर राजधानी हादरली, संपूर्ण दिल्लीसह मुंबईमध्ये हाय अलर्ट जारी

**नवी दिल्ली :** दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ मोठा स्फोट झाला असून त्यामुळे दिल्ली हादरल्याचं दिसून आलं. त्यामध्ये आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दिल्लीतील या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मुंबईसह देशातील प्रमुख शहरांमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दिल्लीतील लाल किल्ला

मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर एक जवळ पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका कारमध्ये हा स्फोट झाला. सुरुवातीला हा सिलेंडरचा स्फोट असल्याचं काही जणांना वाटलं. पण त्यानंतर हा स्फोट गंभीर असल्याचं समोर आलं.

**संपूर्ण परिसर रिकामा केला**

ज्या ठिकाणी हा स्फोट झाला ते ठिकाण लाल किल्ल्यापासून फक्त 800 मीटर अंतरावर आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी हा संपूर्ण परिसर रिकामा केला. या ठिकाणी अग्निशमन दल पोहोचलं असून लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. तसेच या ठिकाणी एनएसजीचे वरिष्ठ अधिकारीही दाखल झाले आहेत. त्याचसोबत फॉरेन्सिक टीमही या ठिकाणी दाखल झाली असून ते पुरावे गोळा करण्याचं काम करत आहेत.

**काही दहशतवाद्यांना अटक**

गेल्या चार दिवसात, म्हणजे 7 नोव्हेंबर ते 10 नोव्हेंबर या दरम्यान दिल्लीमध्ये काही दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये झालेल्या या स्फोटाकडे गांभीर्याने पाहिलं जात आहे.

**दिल्लीमध्ये हाय अलर्ट**

दिल्लीमध्ये झालेल्या या स्फोटानंतर संपूर्ण दिल्लीमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याचसोबत आर्थिक राजधानी मुंबईमध्येही हाय अलर्ट जारी करण्यात आलं आहे.

# मुंबईच्या खाली निर्माण होणार रस्त्यांचे जाळे!

## एकात्मिक भुयारी रस्ता प्रकल्पासाठी डीपीआर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने प्रस्तावित एकात्मिक भुयारी रस्ता प्रकल्पासाठी (इंटिग्रेटेड भुयारी रोड नेटवर्क) सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. विद्यमान रस्ते नेटवर्क आणि जलद गतीने विस्तारत असलेल्या मेट्रो रेल्वे नेटवर्कसोबत हे मुंबईसाठी तिसरे प्रवासाचे माध्यम ठरणार असल्याचे सांगितले जाते.या उपक्रमांतर्गत सागरी किनारा मार्ग, वांद्रे-कुर्ला संकुल येथील हाय-स्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) स्थानक आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जोडणारा भूमिगत कॉरिडॉर उभारण्याचा संकल्प आहे. यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि एस. व्ही. रोड वरील वाहतूक कोंडी कमी होणे अपेक्षित आहे. प्रकल्प कार्यान्वित

झाल्यानंतर अवजड वाहनांची वाहतूक भुयारी रस्त्यावर वळवली जाईल.

सुमारे ७० किलोमीटर लांबीचा हा प्रकल्प तीन टप्प्यांत राबवला जाणार आहे. या माध्यमातून रस्ते आणि मेट्रो यांना पूरक असे एकत्रित वाहतूक नेटवर्क तयार होईल, ज्यामुळे प्रवासाचा कालावधी कमी होईल, प्रदूषणात घट होईल आणि कार्यक्षमतेत वाढ होईल.

# मुंबईत वर्षभरात ७० हजार लोकांना श्वानांचा चावा

## मुंबईत 90 हजार कुत्र्यांसाठी केवळ आठ निवारा केंद्रे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** भटक्या श्वानांची संख्या उदंड झाली असून ती सुमारे दीड ते पावणेदोन लाखांच्या घरात असल्याचे सांगण्यात येत आहे. या श्वानांच्या उपद्रवामुळे मुंबईकर त्रस्त असून वर्षभरात सरासरी ७० हजारांपेक्षा जास्त वाटसरूंचा श्वान चावा घेतात. परंतु सुप्रीम कोर्टाने आता सार्वजनिक ठिकाणी भटके श्वान दिसल्यास थेट राज्याच्या मुख्य सचिवांनाच जबाबदार धरले जाईल, असा निर्णय दिल्यामुळे काही प्रमाणात मुंबईकरांना दिलासा मिळू शकतो.मुंबईत भटक्या श्वानांचा उपद्रव गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. मासळी व अन्य मार्केट, गृह संकुले, रस्ते, पदपथ, शाळा व अन्य सार्वजनिक ठिकाणी भटक्या श्वानांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. यातील काही श्वान हिंसक असतात, त्यामुळे केवळ रात्रीच्या वेळीच नाही, तर दिवसाही मोटारसायकल, पदपथावरून चालणाऱ्या नागरिकांवर थेट हल्ला करतात. विशेषत: लहान मुले दिसली की श्वान धावून येतो. त्यामुळे श्वानांची जेथे झुंड असते, तेथून जाण्याची कोणी हिंमत करत नाही. जायचे झाले तर जीव मुठीत घेऊन जावे लागत आहे. अनेक ठिकाणी श्वान हल्ले करतात, चावाही घेतात, पण त्याची अनेकदा पालिकेकडे नोंदच केली जात नाही. तरीही वर्षभरात किमान ७० हजारांपेक्षा जास्त नागरिकांना श्वान चावा घेत असल्याचे पालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मुंबईत २६ जानेवारी १९९४ पासून भटक्या श्वानांचा उपद्रव नियंत्रणात आणण्यासाठी मुंबई शहर व उपनगरात २६ जानेवारी १९९४ पासून निर्बीजीकरण व लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. २०१७ पासून बंद पडलेला निर्बीजीकरणाचा कार्यक्रम पुन्हा हाती घेण्यात आला. त्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या उत्पत्तीमध्ये काही प्रमाणात घट झाली. ८ वर्षांत १ लाख २५हजारांपेक्षा जास्त कुत्र्यांची नसबंदी करण्यात आली. परंतु भटक्या कुत्र्यांच्या त्रासातून मुंबईकरांची आजही सुटका झालेली नाही.

# मंगळवारपासून योनिक्स – सनराईज महाराष्ट्र सीनियर स्टेट सिलेक्शन रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगड यांच्या वतीने व रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेली योनिक्स-सनराईज द्वितीय महाराष्ट्र सीनियर स्टेट सिलेक्शन रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धा मंगळवार दिनांक ११ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत उलवे नोड मधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे होणार आहे. या स्पर्धेचे भव्य उद्घाटन समारंभ ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते तर स्पर्धेचा अंतिम सामना व समारोप समारंभ १५ नोव्हेंबर रोजी दुपारी ०१ वाजता आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. राज्यातील सुमारे ३०० खेळाडू खालील गटांमध्ये स्पर्धा करणार असून पुरुष

एकेरी, महिला एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी, मिश्र दुहेरी या गटांमध्ये हि स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेतील विजेते, उपविजेते आणि उपांत्य फेरीतील खेळाडूंना एकूण ०४ लाखांचे रोख बक्षिस, चषक प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने अंतिम फेरीतील खेळाडूंकरिता अतिरिक्त विड लाखांचे रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. तरी क्रीडाप्रेमी आणि बॅडमिंटनप्रेमी नागरिकांनी या स्पर्धेचा मनसोक्त आनं बॅडमिंटनच्या रोमांचक लढतींचा उत्सव रंगणार आहे. द ण्याचा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**भारतीय जनता पार्टीच्या पनवेल तालुका उत्तर मंडलाच्या चिटणीसपदी जयदास तेलवणे यांची नियुक्ती करण्यात आली असून सदरचे नियुक्ती पत्र लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी पनवेल तालुका उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, गोपीनाथ पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

**( दैनिक युवक आधार)**

# उरण मधील नगराजशेठ सीबीएसई इंटरननॅशनल स्कूल मध्ये 'वंदे मातरम' गीताचे समुहगान

**दैनिक युवक आधार**

**कॉलेजकट्टा आरती सुरवसे**

स्वातंत्र्य लढ्यात 1930 साली झालेल्या उरणच्याचिरनेर जंगल सत्याग्रहांतील हुतात्म्यांचा मोठा सहभाग असून 25 सप्टेंबर रोजी शासकीय मान्सामानात शहिदांनामान वंदना देण्यात देशाच्या स्वातंत्र्याचा 78वा स्वातंत्र्य दिन साजरा होत नकळतअसताना राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' गीतने आपली 150 वर्ष पूर्ण केली भारत मातृभूमीचे साक्षात चित्र प्रत्येकाच्या हृदयात करण्याचे सामर्थ्य या गीतामध्ये आहे. हे

मातृभूमीचे स्तवन गीतअसून त्या अनुषंगाने सोमवारी उरण मधील नगराज शेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल मध्ये देश भक्तीने आणि स्तुतिसुमने प्रेरित 'वंदे मातरम' समूह गायन विशेष कार्यक्रम संपन्न झाला.यावेळीस्कूलच्या प्रिन्सिपॉल श्रीमती ज्योती म्हात्रे यांनी या गीता संदर्भात माहिती सांगतना त्या म्हणल्या म्हणून वंदे मातरम हे गीत राष्ट्रकवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिले असून या गीताला याला 150 वर्षे पूर्ण झाली आहेत रवींद्रनाथ टागोर यांनी राष्ट्रीय सभासभेच्या अधिवेशनात 1896 वावर्षी प्रथम वंदे मातरम् ही रचना गायली होती.त्यानंतर राष्ट्रीय महासभेने याच वर्षी हे गागीतांतील पहिली दोन कडवी राष्ट्रगीत म्हणून स्वीकारलीवंदे मातरम् असे शब्द उच्चारताच प्रत्येक भारतीयाच्या रोमा-रोमात देशभक्तीचा संचार होतोया गीताचर ब्रिटिश सरकारने बंदी घातली आणि कोणीही समूहाने हे गीत म्हटले की, त्यांना तुरुंगात टाकले जात असे. मातरम गीत संपूर्ण देशाला सदैव प्रेरक आणि सदैव नवी स्फूर्ती देत आहे. आज 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नाही, तर ती भारताच्याआत्मसम्मानाची ओळख आहेअसेच्या शेवटी म्हणाल्या यानंतर विद्यार्थांनी भारतमाताकी जय अशा घोषणा देत एका सुरात समूहगान सादर केलेया वेळी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी शिक्षकवृंद,शिक्षिकेतर कर्मचारी उपस्तीत होते पून्हा एकदा भारत माताकी जय ,वंदेमातरम् आशा जोरदार घोषणांनीराष्ट्रगीताची सांगता करण्यात आली.

# आदईचे शेकाप उपसरपंच विलास शेळके यांचा समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** आदई ग्रुप ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच व शेकापचे नेते विलास शेळके यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पक्षाची शाल देऊन त्यांचे स्वागत केले. या प्रवेशामुळे शेकापला मोठा झटका बसला आहे.

पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र

**शेकापला मोठा झटका बसला**

पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद डाळे, भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, यतीन पाटील, अंकुश ठाकूर, भाईशेठ पाटील, सदाशिव पाटील, बाळाराम पाटील, एकनाथ मोकल आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, भाजप हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असून कार्यकर्तेच पक्षाचा कणा आहेत, असे सांगून विलास शेळके यांच्यासारखे कार्यकर्ते पक्षाची ताकद वाढवतात आणि कार्यकर्त्यांवर चालणारा पक्ष हीच राज्य परिषद सदस्य अविनाश कोळी, माजी सरपंच दिनेश खानावकर, उपसरपंच अविनाश देसाई, राजेंद्र राजे, किशोर भंडारी, ज्ञानदेव मोरे, संजय मोरे, विजय पंजाबी आदी कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. सर्वांचे स्वागत करण्यात आले.